ज्ञानपथ बहुउदेशिय शिक्षण प्रसारक मंडळाचे शुअरटेक कॉलेज ऑफ नर्सिंग,नागपुर

बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढविण्यास परवानगी.

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,**

गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

शासन निर्णय क्रमांक एमईडी १२१८/प्र.क्र.३३३/१८/ शिक्षण-२

**दिनांक:-२४ ऑक्टोबर,२०१८**

**वाचा:-**

१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/ पीबी/ युजी/ पी-५/१४१४/२०१७, दिनांक २०.१२.२०१७

२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. एनयुआर/ज्ञानपथ बहुउदेशिय शिक्षण प्रसारक मंडळाचे शुअरटेक कॉलेज ऑफ नर्सिंग,नागपुर/बी.एस्सी.(नर्सिंग)प्रवेशक्षमतावाढ/खाजगी/ई/१८/१०१३५, दिनांक २८.०९.२०१८

**प्रस्तावना:-** ज्ञानपथ बहुउदेशिय शिक्षण प्रसारक मंडळाचे शुअरटेक कॉलेज ऑफ नर्सिंग,नागपुर या महाविद्यालयातील बी.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्याबाबत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक यांची संदर्भाधीन पत्रान्वये शासनास शिफारस प्राप्त झाली होती. सदर शिफारशीस अनुसरुन उक्त महाविद्यालयाची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली होती. संचालनालयाने सादर केलेला सक्षमता तपासणी अहवाल व शिफारस विचारात घेऊन उक्त महाविद्यालयातील बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासुन वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक आणि वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन ज्ञानपथ बहुदेशिय शिक्षण प्रसारक मंडळाचे शुअरटेक कॉलेज ऑफ नर्सिंग,नागपुर या महाविद्यालयातील बी.एस्सी. (नर्सिंग) या अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासुन ४० वरुन ६० विद्यार्थी करण्यास खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आहे:-

**अटी व शर्ती:-**

१) सदर नर्सिंग महाविद्यालयातील बी.एस्सी. (नर्सिंग) या अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता एकुण ६० विद्यार्थी एवढी राहील.

२) राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय/ मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी.

Received on 25/10/18.

PRINCIPAL
SURETECH COLLEGE OF NURSING
NAGPUR

आ.क्र. ३० 26/10/2018

३) शासकीय नियम/अधिनियम/निर्णय तसेच, मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) केंद्र शासन, भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, राज्य शासन आणि विद्यापीठाने नर्सिंग अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

७) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशीत करु नये.

८) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

९) सदर अभ्यासक्रमाकरीता शुल्क नियामक प्राधिकरणामाकडून शुल्क निश्चिती करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. सदर आदेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अजित सासुलकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वै.शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय,मुंबई.
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय,मुंबई.
आयुक्त,राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण / शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरण, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्राचार्य, ज्ञानपथ बहुदेशिय शिक्षण प्रसारक मंडळाचे शुअरटेक कॉलेज ऑफ नर्सिंग,नागपुर
निवडनस्ती (शिक्षण -२)

edu-२ Gr २०११ c - ७१६ -

PRINCIPAL
SURETECH COLLEGE OF NURSING
NAGPUR